



# झिप्पर कसे संलग्न करावेत

ह्या वीडियोमध्ये आपण कपडाला झिपर कसे लावायचे हे शिकू! यासाठी मशीन बरोबर येणार्या झिपर फुट चा वापर करू.



आपल्याला लागणार दोन एक सारखे कपडाचे तुकडे, त्याच लांबीचे झिपर आणि काही बीडीत पिना.

कपडाची पांढरी बाजू उलटी आहे आणि मुलायम लाल बाजू सुलटी आहे. तसेच झिपर ची सुलटी बाजू रनरवाली आहे आणि उलटी बाजू सपाट आहे.

रनर खाली आणून झिपर उघडा आणि सुलटी बाजू कपडाच्या सुलट्या बाजुवर ठेवा. आता कपडाच्या आणि झिपर च्या कडा एकत्र करा.

काळजीपूर्वक त्यांना संरेखित करून बीडीत पीणनी जोडा म्हणजे त्या हलनार नाहीत.

झिपर फुट ला अटॅच करण्याकरता सुई वर घ्या आणि प्रेसर फुट लिवरला वर ढकला म्हणजे क्लँप मधून प्रेसर फुट सुटटा पडेल.


आता झिपर फुट प्रेसर फुट बार च्या खाली ठेवा. प्रेसर फुट ला खाली घ्या म्हणजे त्याला झिपर फुट लागेल. मशीन सुरू करा, आणि झिपर सोडलेला कापड पुढच्या कडावर नीट ठेवा.

शीलाई सुरू करण्यापूर्वी पॅटर्न सेलेक्टर डाइयल ला ए वर आणि स्टिच लेंथ ला चार वर ठेवा.

आता कापड शिवायला सुरूवात करा. बीडीत पिन्स जवळ आल्यावर त्यांना काढायचा विसरू नका.





शेवटवर आल्यावर प्रेसर फुट वर उचला कापड काढून धागे कापुन टाका. आता तुम्ही दुसरी बाजू शिवायला तयार आहात, कपडाचा दुसरा तुकडा सुलटा ठेवून त्यावर झिपरची दुसरी साइड नीट बसवा बीडीत पीण ने हे लावून घ्या.

आता याला झिपर फुट च्या कडेवर संरेखित करा, शिवायला सुरूवात करा. शेवटला आल्यावर प्रेसर फुट वर करा आणि रनर वर ओढून घ्या आणि झिप बंद करा. शेवट पर्यंत शिवत जा.

सुई व फुट वर उचलून कपडा काढून घ्या आणि धागा थ्रेड कटर नि कापून घ्या. आता झिपर बरोबर कपडाला जोडली गेली आहे. वाह! एकदम उत्तम शिवला गेलाय. बघताय ना! वेगवेगळ्या डिज़ाइन्स आणि रंगांच्या झिपस आणि कपडाबरोबर एक्सपेरिमेंट करा.

तुमची कल्पकता वापरुन स्वता:डिज़ाइन केलेले वेगवेगळे झिपर पाउचस बनवा. तर आता तोपर्यंत प्रॅक्टिस करा जोपर्यंत तुम्ही या कामात तरबेज होत नाहीत.